रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक ४९ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

अल्पवयीन मुलीचा विनयभंग

म्हसळा : अल्पवयीन मुलगी रस्त्याने चालत जात असताना दबा धरून बसलेल्या आरोपीने पीडितेचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. घटनेची फिर्याद पीडितेने म्हसळा पोलीस ठाण्यात दिली असता पोलिसांनी माज मुजीब तालिब याला गजाआड केले आहे. माज मुजीब तालिब याच्यावर म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सालविंडे रस्त्यावरील पुलावर सकाळी ८.३० वाजता ही घटना घडली असल्याचे सांगण्यात आले. माज याच्यावर अशा प्रकारचा हा दुसरा गुन्हा नोंद झाला आहे.

कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २५ जुलै २०२४

किंमत ४ ₹

एसटी चालकाची स्टंटबाजी

पाली/बेणसे : पाली बस स्थानकावरून बुधवारी (दि.२४) सकाळी पावणे अकरा वाजता घोडगाव मार्गे पेणकडे जाणारी राज्य परिवहन महामंडळाची बस निघाली. मुसळधार पाऊस सुरु होता. अंबा नदीने रौद्ररूप धारण केले होते. गावाजवळील अंबा नदी पुलावरून पाणी जात होते. अशा धोकादायक परिस्थितीत मागचा पुढचा विचार न करता चालकाने स्वतःचा व प्रवाशांचा जीव धोक्यात घालून पुलावरून वाहत्या पाण्यातून बस नेली. यासंदर्भात संबंधित चालक व वाहक यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी अशी

•> पान ३ वर

Unlock your Digital Curiosity
Learn Basic to Advanced Digital Skills!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
Powered by AI-ML
mscit.mkcl.org
प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

आजचा अग्रलेख

मोदींच्या ढोंगाचे स्मारक

वे|ध|क

चांदोली धरणाजवळ सौम्य भूकंपाचा धक्का

सांगली : चांदोली धरणाच्या परिसरात बुधवारी (दि.२४) पहाटे भूकंपाचा सौम्य धक्का बसला. यामुळे धरणाला कोणतीही हानी झाली नसून धरण सुरक्षित असल्याचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. पहाटे ४.४६ वाजता भूकंपाचा धक्का जाणवला वारणावती येथील भूकंप मापन केंद्रावर याची तीव्रता ३ रिश्टर नोंदली गेली असून यामुळे कोणतीही हानी झालेली नाही. भूकंपाचे केंद्र मापन केंद्रापासून आठ किमी होते.

नेपाळमध्ये विमान कोसळून १८ ठार

काठमांडू : नेपाळची राजधानी काठमांडू येथे विमान कोसळले. विमानातील १९ जणांपैकी १८ जणांचा मृत्यू झाला आहे. पायलट कॅप्टन शाक्य यांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल केले आहे. हे विमान काठमांडूहून पोखराला जात होते. सकाळी ११ वाजता त्रिभुवन विमानतळावरून विमानाने उड्डाण केले. काही क्षणातच ते कोसळले. हे विमान सूर्या एअरलाइन्सचे होते.

राजिपचा निधी पडून

बांधकाम विभागाचे रस्त्यांकडे दुर्लक्ष

इतर जिल्हा मार्ग अंतर्गत कामे 132

प्रशासकीय मान्यता 19, 52,00,000 रुपये

वितरीत निधी 17,32,00,000 रुपये

जून अखेर झालेला खर्च 8,47,00,000 रुपये

ग्रामीण रस्ते अंतर्गत कामे 194

प्रशासकीय मान्यता 21,19,00,000 रुपये

वितरीत निधी 20,80,00,000 रुपये

जून अखेर झालेला खर्च 8,24,00,000 रुपये

> जिल्हा नियोजन समितीकडून २०२३- २०२४ मध्ये इतर जिल्हा मार्गअंतर्गत १७ कोटी रुपये व ग्रामीण रस्ते अंतर्गत २० कोटी रुपये जिल्हा परिषद बांधकाम विभागाला वर्ग करण्यात आले आहेत. सुमारे ४० कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
>
> – जयसिंग मेहेत्रे, जिल्हा नियोजन अधिकारी, रायगड

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

गावे, वाड्यांना जोडणारे रस्ते चकाचक व्हावेत यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा परिषद बांधकाम विभागाला रस्त्यांच्या कामांसाठी ३८ कोटी १२ लाख रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला. त्यापैकी फक्त १६ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात यश आले आहे. निधी मिळूनही गावे, वाड्यांमधील रस्त्यांची दुरुस्ती करण्यास बांधकाम विभाग अपयशी ठरल्याने नागरिकांना खड्ड्यातूनच प्रवास करावा लागत आहे.

ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून साधला जातो. वैयक्तीक, सार्वजनिक सुविधा जिल्हा परिषदेमार्फत पुरविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यात शासनाच्या वेगवेगळ्या योजना जिल्हा

•> पान ३ वर

महाविकास आघाडी कायम

शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे प्रतिपादन

। पेण । प्रतिनिधी ।

भविष्यात महायुती तुटल्याशिवाय राहणार नाही. मात्र महाविकास आघाडी कायम राहणार आहे. आपण महाविकास आघाडीसोबत, शरद पवार यांच्या बरोबर राहणार आहोत. आजच आपण आपल्या जागा निश्चित केल्या नाहीत. परंतु ज्या आपल्या परंपरागत जागा आहेत, त्या आपण निश्चित आपल्याकडे घेणार आहोत. महाविकास आघाडीतील तीन पक्षांचे प्रमुख जागा वाटपासंदर्भात सामंजस्याने वाटाघाटी करत आहेत. तर महायुतीमध्ये दररोज अजित पवार नवनवीन वक्तव्य करत आहेत. त्यामुळे महायुती तुटणारच. तसेच नजीकच्या काळात पुन्हा एकदा आपण विधान परिषदेच्या वरिष्ठ सभागृहात असणार अशा प्रकारच्या व्युहरचनादेखील सुरू असल्याचे प्रतिपादन शेकापचे सरचिटणीस माजी आ. जयंत पाटील यांनी केले आहे.

पेण येथील शेतकरी कामगार पक्षाच्या नूतन कार्यालयाचे उद्‌घाटन बुधवारी (दि.२३)संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

•> पान ३ वर

पनवेल तालुक्यात डेंग्यूचे १८ रुग्ण

। पनवेल । प्रतिनिधी ।

पावसाळ्याच्या दिवसात साथ रोगाची लागण होऊ नये या करिता खबरदारीचे उपाय राबवल्याने पनवेल महानगर पालिका हद्दीत डेंग्यूचे रुग्ण नाहीत मात्र तालुक्यातील इतर भागात मात्र डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहेत. डेंग्यूच्या १८ रुग्णांची नोंद झाल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

पावसाळ्याचे दिवस असल्याने पनवेलमध्ये मच्छरांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे पनवेल परिसरात डेंग्यूदेखील वाढताना दिसत आहे. सद्यस्थितीत पनवेल तालुक्यातील गावांमध्ये डेंग्यूचे १८ रुग्ण सापडले आहेत.

पनवेल तालुक्यातील करंजाडे येथे ५, सुकापुर येथे ४, उसर्ली खुर्द २, विचुंबे ६, विहिघर १ असे एकूण १८ रुग्ण सापडल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली. सुकापूर परिसरात डेंग्यूचे अधिकचे रुग्ण सापडून येत असल्याचे येथील नागरिक सांगत आहेत. त्यामुळे काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी पावसामुळे गटारे तुंबून रस्त्यावर सांडपाणी मोठ्या प्रमाणात पसरत आहे. या सांडपाण्यावर डेंग्यूच्या डासांची पैदास मोठ्या प्रमाणात होते. अशा परिस्थितीत आरोग्य विभाग, ग्रामपंचायतीने व्यवस्थित खबरदारी घेऊन योग्य त्या उपाययोजना केल्या पाहिजे, असे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

विजेच्या धक्क्याने म्हैस मृत्यूमुखी

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ येथील साईमंदिर परिसरात धामोते येथे शेतकऱ्याच्या दुभती म्हशीला सकाळी विजेचा धक्का लागल्याने ती मृत्युमुखी पडली आहे.

दुभती म्हैस दगावल्याने शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले असून महावितरणकडून या घटनेचा पंचनामा करण्यात आला आहे. नेरळ कळंब रस्त्यावर साईमंदिर येथे सुखदेव

•> पान ३ वर

राष्ट्रीय आरोग्य न्याय संशोधन संस्था
संचलित
नर्सिंग कोर्स प्रवेश देणे सुरू
मोफत प्रवेश*

संस्था	अभ्यासक्रम	पात्रता	संपर्क
रायगड इंस्टीट्युट ऑफ नर्सिंग एज्युकेशन MH CET CODE - 9416 MUHS CODE - 151146 मु.नादगाव, ता. मुरुड-जंजिरा जि.रायगड	B.Sc Nursing ०४ वर्ष	१२ वी सायन्स MH-Bsc Nursing CET	७७७४८५०५४५ ९९२०२६१०१७ Mail Id raigadine@gmail.com web : wwww.raigadine.co.in
	GNM ३ वर्ष–	१२ वी पास कोणतीही शाखा	
ओम कॉलेज ऑफ नर्सिंग MSBNPE CODE - 1257 मु.पो. लाडवली ता. महाड, जि.रायगड	GNM ३ वर्ष		७०८३६९७९९४ ९८१९०७११९८ Mail Id omconmahad@gmail.com web : wwww.omcon.co.in
नुतन स्कुल ऑफ नर्सिंग MSBNPE CODE - 0016 मु.नांदगांव, ता. मुरुड-जंजिरा जि.रायगड	ANM २ वर्ष GNM ३ वर्ष		९५४५९८९८३६ ९२७०२०९५२० Mail Id nootannursing@gmail.com web : wwww.nootannursing.in

शैक्षणिक कर्ज व शिष्यवृत्तीची सोय
१००% नोकरीची संधी
*अटी लागू
सर्व संस्था भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली, महाराष्ट्र परिचर्या परिषद मुंबई, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यकीय शिक्षण मंडळ मुंबई, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक आणि महाराष्ट्र राज्य मान्यताप्राप्त

मनोज जरांगेंचं उपोषण स्थगित

। जालना । वृत्तसंस्था ।

मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील हे १३ जुलैपासून उपोषणाला बसले होते. मात्र आता त्यांनी त्यांचं उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

सरकारने मनोज जरांगेंकडे दोन महिन्याची मुदत मागितली होती. मात्र, मनोज जरांगे यांनी सरकारला १३ जून ते १३ जुलैपर्यंत एक महिन्याचा अवधी दिला होता. १३ जुलैपर्यत सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न निकाली न काढल्यामुळे मनोज जरांगे पुन्हा उपोषणाला बसले. मात्र काल मंगळवारी (दि.२३) रात्री मनोज जरांगे यांची प्रकृती ढासळली. परिणामी, त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना जबरदस्तीने सलाईन लावली. त्यामुळे मनोज जरांगे नाराज झाले आहेत. सलाईन लावून बेगडी उपोषण मी करणार नाही, असं सांगत त्यांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच त्यांनी सरकारला १३ ऑगस्टपर्यंतची डेडलाईन दिली आहे. जरांगे पाटील सरकारला म्हणाले, तुम्हाला दोन महिने हवे होते, त्यानुसार मी १३ ऑगस्टर्यंतची मुदत देतो. तुम्ही म्हणाला होता त्याप्रमाणे दोन महिन्यात दिलेला शब्द पाळा.

सरकारला १३ ऑगस्टची डेडलाईन

माणगावने वृक्षलागवडीत गाठला उच्चांक!

सलीम शेख

। माणगाव ।

वृक्षतोडीला आळा घालण्यासाठी शासन कठोर पाऊल उचलत आहे. पर्यावणाचा समतोल राखण्यासाठी सर्वच सामाजिक संस्था, संघ, पर्यावरणप्रेमी आपापल्या क्षेत्रात प्रगतीशील काम करत आहेत. दिवसेंदिवस जागतिक तापमान वाढ हि देशाची समस्या बनली आहे. जिल्ह्याला निसर्गाने भरभरून दिले आहे. वाढत्या वणव्यामुळे झाडे,

१ लाख वृक्षाचा आकडा पार, ६ दरडग्रस्त गावात बांबू लागवडीने विणणार जाळे

•> पान ३ वर

तीर्थक्षेत्र दर्शनाची ज्येष्ठांना लॉटरी

। रायगड । प्रतिनिधी ।

ज्येष्ठ नागरिकांना देशातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्री मोफत यात्रा करण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना राबवण्याचे नुकतेच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषित केले होते. त्यानुसार योजनेचा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाने प्रसिद्ध केला असून त्यात देशभरातील एकूण ७३ व महाराष्ट्रातील ६६ तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी तीर्थ दर्शन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे. योजनेसाठी लॉटरीद्वारे प्रवाशांची निवड करण्यात येणार आहे.

देशातील मोठ्या तीर्थयात्रांना जाऊन मनःशांती तसेच आध्यात्मिक पातळी गाठणे सुखकर व्हावे, यासाठी राज्यातील सर्व धर्मीयांमधील ज्येष्ठ नागरिकांना भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची, दर्शनाची संधी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेच्या माध्यमातून मिळणार आहे. योजनेअंतर्गत निर्धारित तीर्थक्षेत्रांपैकी एका यात्रेकरिता पात्र व्यक्तींना एकदाच योजनेचा लाभ मिळणार आहे; तसेच प्रवास खर्चासाठी कमाल मर्यादा प्रतिव्यक्ती ३० हजार रुपये इतकी राहणार आहे. यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास इत्यादी बाबींचा समावेश असेल. लाभार्थीचे वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार असावे. लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व वय वर्षे ६० वरील ज्येष्ठ नागरिक असावा. योजनेचा लाभ मिळवण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करावे लागणार आहेत. तसेच बस प्रवासाचे आयोजन करण्यासाठी अधिकृत टुरिस्ट कंपन्या तसेच रेल्वे प्रवासासाठी आयआरसीटीसी समकक्ष अधिकृत असलेल्या कंपन्यांची निवड करण्यात येणार आहे. प्रवाशांची निवड जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समितीद्वारे करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात कोटा निश्चित करण्यात येऊन प्राप्त झालेल्या अर्जाच्या उपलब्धतेनुसार लॉटरीद्वारे प्रवाशांची निवड करण्यात येणार असल्याची माहिती, जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

संपूर्ण मनःशांतीसाठी कंपनी-फिट CNG
Hyundai कंपनीच्या CNG कार अस्सल वॉरंटी, वर्धित सुरक्षा आणि उत्कृष्ट कार्यप्रदर्शन युक्त
Grand i10 NIOS लाभ ₹ 48 000* पर्यंत
AURA लाभ ₹ 43 000* पर्यंत
EXTER लाभ ₹ 10 000* पर्यंत

Grand i10 NIOS
AURA
EXTER

शक्तिशाली आणि पर्यावरणास अनुकूल पॉवरट्रेन
खास ट्यून केलेले सस्पेन्शन
सुपीरियर CNG टाकी क्षमता Grand i10 NIOS: 60 l (पाणी समतुल्य) AURA : 65 l (पाणी समतुल्य) Exter: 60 l (पाणी समतुल्य)
कॉम्पॅक्ट आणि टिकाऊ इंजेक्टरसह शांत केबिन
डबल स्टेज CNG रेग्युलेटर सह सुरळीत ड्रायव्हिंग
RDE अनुरूप आणि E20 इंधन तयार असलेले
HYUNDAI
3 YEAR 1 00 000km** Warranty Coverage
UPTO 7 YEARS Extended Warranty^
3 YEAR Unlimited** Kilometer Warranty
3 YEARS Road Side Assistance (RSA)#
UPTO 5 YEARS Shield of Trust Running Repair Package
UPTO 5 YEARS Shield of Trust Super Maintenance Package
*For CSD, Government and Corporate Requirements, contact Mr. Joseph Fernandes at jfernandes@hmil.net or 9920209565
Give a missed call on 9555295868
my Hyundai app
Hyundai Promise Certified Pre-Owned Car
Hyundai Cl!ck to Buy Scan here
*Terms & Conditions apply. Benefits include cash discount, exchange bonus and benefits for government or corporate employees, whichever is applicable. Benefits may vary with variants and are subject to change without prior notice. **3-year warranty or upto 1 00 000 km whichever is earlier for Grand i10 NIOS, AURA, i20 & i20 N line. 3-year unlimited km warranty is applicable for VENUE, VENUE N Line, CRETA, ALCAZAR, TUCSON, VERNA, KONA Electric and IONIQ 5. ^Upto 7 years extended warranty is applicable only for petrol variants. HMIL reserves the right to withdraw/modify the scheme without prior notice. Visit your nearest Hyundai dealership for more details. Hyundai urges you to follow traffic rules – these are meant to keep you safe on roads.
विशाल ह्युंदाई पनवेल, Ph: 084228 10904 अलिबाग, Ph: 084228 10907
शरयू ह्युंदाई पेण वडखळ, Ph: 091679 50080, 080473 63111

रस्त्यावर महाकाय वृक्ष कोसळला

नगरपंचायत कर्मचाऱ्यांकडून तात्काळ रस्ता खुला

। तळा । वार्ताहर ।

शहरातील वडाची वाडी येथे भर रस्त्यात कोसळलेल्या महाकाय वृक्षाला नगरपंचायत कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर बाजूला करून रस्ता वाहतुकीसाठी खुला केला.

गेल्या आठवडा भरापासून तळा तालुक्याला मुसळधार पावसाने झोडपले असून मंगळवारी मुसळधार पावसासह सुटलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे वडाची वाडी रस्त्यावर असलेले महाकाय वृक्ष कोसळले. सुदैवाने या ठिकाणी कोणीही नसल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु हे झाड भर रस्त्यात कोसळल्याने वडाची वाडी व पारधी आळी या दोन वाड्यांचा रस्ता बंद झाला होता. याबाबत नगरपंचायत कर्मचाऱ्यांना माहिती देण्यात आल्यानंतर क्षणाचाही विलंब न करता नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी मशीनच्या साहाय्याने सदर झाडाला बाजूला करून रस्ता वाहतुकीसाठी खुला केला.यांसह वरचा मोहल्ल्यातील चिंचेजवळील व तळेगाव रस्त्यावरील तुटलेली झाडेही नगरपंचायत कर्मचाऱ्यांकडून तातडीने हटविण्यात आली.

जाहीर नोटीस

अर्ज क्र. :११८ /२०२४

मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात

श्री. किशोर सरेमल जैन
वय ५० वर्षे, धंदा : शेती. अर्जदार
रा. २५४२ एकता नगर, ता. माणगांव, जि. रायगड
विरूध्द
१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत तळाशेत, ता. माणगांव, जि. रायगड. सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो., पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. किशोर सरेमल जैन यांचा जन्म मौजे तळाशेत, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०४/०६/१९७४ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. ०८/०७/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे तळाशेत, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०४/०६/१९७४ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. किशोर सरेमल जैन यांचा जन्म मौजे तळाशेत, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०४/०६/१९७४ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव सही
ता. २३/०७ /२०२४ **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल गुरुनाथ तुकाराम शिरसाट, यांनी जमीन मालक सुनील शंकर भोसले, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीच्या, खालील वर्णनाच्या जमीन मिळकती, कायमच्या विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे:-

-: मिळकतींचे वर्णन :-

मौजे दहीगाव, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकती

सर्व्हे नंबर	क्षेत्र हे. आर. पॉ.	आकार रु. पै.
२५/२१	०.०४.००	०.०५

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दूसरे कोणाचाही, कोणत्याही व कसल्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट, यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, खरेदीखत करुन मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत कळावे
दि. २५/०७/२०२४ **ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि.,
रूम नं. १०, दुसरा माळा कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड. पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

जाहीर नोटीस

सर्व नागरीकाना या जाहीर नोटीसीव्दारे सुचित करण्यात येते की, रुपेश रविंद्र मांडे रा. आर एम इंटरप्रायझेस नेमिनाथ रेसीडेन्सी शॉप नं ४ मुद्रे कर्जत ता. कर्जत जि. रायगड यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकतीचे विद्यमान मालक नंदी को. ऑप. हौ. सोसायटी रा. लाडीवली ता कर्जत जि रायगड यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे मिळकतीचे वर्णन

मौजे-लाडीवली, ता. कर्जत, जि. रायगड

सर्व्हे नं.	हि.नं.	क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी)	आकार (रू.पै.)
६०	२१	४.५०.६०	९.०३
६०	२२	४.१८.००	८.३६

सदरची बीन शेती मिळकती हि वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तद्‌गभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशील विकत देण्याचे ठरविले आहे तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण दान, बक्षीस फरोक्त चार्ज लिज अटॅचमेंट, लिएन, वगैरे अथवा अन्य इतर कोणतेहि प्रकारचा कायदेशिर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्रीपुराव्यासह लेखी हरकत कळावी मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पुर्ण करतील मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे

अशिला तर्फे ॲडव्होकेट

दिनांक : २४/०७/२०२४ **ॲड सुनिल बबन मेंढरे**
ऑफीस पत्ता गाळा नं १,
गणेश अर्पा युको बॅंक शेजारी
कर्जत ता कर्जत जि. रायगड
८०८७३७३७९०

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे इंद्रपै, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. १३१/२, एकूण क्षेत्र ०-२५-३० हे. आर., आकार ७.२६ रू. पै. ही मिळकत, सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिपक रघुनाथ पेंडसे रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरहू मिळकत आमच्या अशीलांनी खरेदी करण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २४/०७/२०२४ **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बॅंकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

जाहीर नोटीस

अर्ज क्र.: -१३०/२०२४

मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात

श्री. कृष्णा नथुराम साखळे
वय ६६ वर्षे, धंदा : शेती. अर्जदार
रा. मु. चाच, पो. बोरवाडी,
ता. माणगांव, जि. रायगड
विरुध्द
१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत शिरसाड,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. कृष्णा नथुराम साखळे यांची बहिण श्रीम. यमुनाबाई नथुराम साखळे लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. जयश्रीबेन दत्ताराम पोळेकर-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे चाच, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०९/०६/१९६४ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. १३/०६/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची बहिण श्रीम. यमुनाबाई नथुराम साखळे-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. जयश्रीबेन दत्ताराम पोळेकर- लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे चाच, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०९/०६/१९६४ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. कृष्णा नथुराम साखळे यांची बहिण श्रीम. यमुनाबाई नथुराम साखळे-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. जयश्रीबेन दत्ताराम पोळेकर- लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे चाच, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०९/०६/१९६४ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव सही
ता. २३/०७/२०२४ **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसीलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड

नोटीस ज.म.र.अर्ज ५३/२०२४

प्रति,
श्री. इम्तियाज इब्राहीम शाबान
रा. राजेंद्र प्रसाद रोड, दाभणे चाळ,मुरुड-जंजिरा अर्जदार
विरुद्ध
मुख्याधिकारी,
मुरुड जंजिरा नगर परिषद सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदार श्री. इम्तियाज इब्राहीम शाबान यांची बहिण श्रीम. रुबिना इब्राहीम शाबान हे/ह्या दि.७-६-१९७४ रोजी राहत्या घरी म्हणजे गाव मुरुड, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे जन्म झालेले असून त्यांच्या जन्माची नोंद मुरुड-जंजिरा नगर परिषद कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरिता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, रुबिना इब्राहीम शाबान हे दि. ७-६-१९७४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीलांमार्फत मे. न्यायालयांत दि. २०-०८-२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना त्यांचे मुरुड-जंजिरा नगरपरिषद जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये मृत्यूची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १८-०७-२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
(रोहन शिंदे)
तहसीलदार मुरुड-जंजिरा

जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीच्या विद्यमान मालक सौ. खुशबू दत्ता यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असून देखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे /व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

-: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड.	४८२	०-५२-१० पैकी ०-२६-०५	३.३६

अलिबाग, **राजेंद्र दा. पाटील,**
दिनांक : २५/०७/२०२४. ॲडव्होकेट.
कृष्णवंदन-२, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९८२२५२८९३१.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे आवास, ता. अलिबाग, जि. गट नं. ९६/१, क्षेत्र ०-४५-२० हे.आर., पो.ख. ०-०४-०० हे. आर., एकूण क्षेत्र ०-४९-२० हे. आर. आकार ९.६७ रू.पै.या मिळकतीपैकी क्षेत्र ०-१६-०० हे. आर. ही मिळकत, सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक १) अतुल गोविंद पुराणीक, २) मृणालीनी अरुण पालकर, ३) आल्हाद अरुण पालकर, ४) सानिका अरुण पालकर, यांच्याकडून सदरहू मिळकत आमच्या अशीलांनी खरेदी करण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
तारीख : २४/०७/२०२४ पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बॅंकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२५ जुलै

१) श्री.(डॉ) दिपक शंकर आमले
अलिबाग,
२५-०७-१९५०

२) श्रीम.निशा सखाराम साळुंखे
कुरूळ, अलिबाग,
२५-०७-१९४८

३)श्री.अशोक विष्णु जोशी
ब्राम्हणआळी, अलिबाग
२५-०७-१९५३

४)श्री.रमेश शांताराम पाटील
मु.मुळे, अलिबाग
२५-०७-१९५९

अर्जदारतर्फे ॲड. जगदिश ज. म्हात्रे

जाहिर नोटीस

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश व स्तर सो. यांच्या न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज क्र.११३/२०२४

१) श्रीमती कामिनी कमलाकर म्हात्रे,
वय ६२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी,
रा. मु.पो. झिराड, घर नं. १०,
अलिबाग रेवसरोड, झिराड,
ता. अलिबाग जि. रायगड ४०२२०१
आधार नं. ७५०१४६६२१८७
२)सौ.अक्षया विलास पाटील,
वय ३७ वर्ष, व्यवसाय : गृहिणी,
रा.मु.पो.झिराड, अन्वी बंगला,
नोस्टालजिया शोरूमसमोर, अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१
आधार नं. २२८४६८२४९२३३
३) सौ.कोमल सुनिल पाटील,
वय ३३ वर्ष, व्यवसाय : गृहिणी,
कायमचा पत्ता:- मु.पो. झिराड,
घर नं. १०, अलिबाग रेवस रोड, झिराड,
ता. अलिबाग जि.रायगड ४०२२०१ अर्जदार
सध्याचा पत्ता:- रा. रूम नं. २,
तेजस्वी सिएचएस, गोवंडी ईस्ट,
गोवंडी रेल्वे स्टेशन जवळ,
मुंबई ४०००८८
आधार नं. ९९९५८४०६४१४२
विरूध्द
कोणीही नाही सामनेवाला

सदर जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की.

अर्जदार क्र. १ कामिनी कमलाकर म्हात्रे यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडिल मयत कै. कमलाकर माया म्हात्रे यांचे दि. २२/०९/२०२० रोजी मुंबई येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये आजारपणाने निधन झाले आहे. अर्जदार क्र. १ कामिनी कमलाकर म्हात्रे यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडिल मयत कै. कमलाकर माया म्हात्रे यांचे वारस असलेबाबत जाहिर करून मिळणेकरिता मे. कोर्टात तसा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दि.१२/०८/२०२४ रोजी पर्यंत मे. न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही..

आज दिनांक ८/७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

सही /- शिक्का कोर्टाचा सही /-
कनिष्ठ लिपिक **कनिष्ठ लिपिक**
सि.ज.सि.डी.अलिबाग-रायगड **सि.ज.सि.डी.अलिबाग-रायगड**

जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

मौजे - सोगांव, ता.अलिबाग, जि. रायगड हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत.

मौजे	गट नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू.पैसे.
सोगांव	१४१	२.२८.००	५३.९४
		पैकी १.८२.४०	

येणे प्रमाणे वर्णनाचे मौजे सोगांव गट नं. १४१ या मिळकतीपैकी ४/५ हिश्श्याची म्हणजेच १.८२.४० हे.आर.चौरस मिटर क्षेत्राची मिळकत व त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशी मिळकत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक साधना भगवान मयेकर, निला राजाराम चिंबुलकर, कांचन राजाराम चिंबुलकर व अस्मिता चंद्रशेखर कांबळी तर्फ अखत्यारी श्री. पुष्पराज भगवान मयेकर, मु. ५ वा मजला, रूम नं.३९, सॅमसन अपार्टमेंट, ५७ रामचंद्र भट मार्ग, उंबरखाडी, डोंगरी, चिंचबंदर, मुंबई ४०000९ आणि मु. सोगांव, पो. मापगांव, ता.अलिबाग, जि. रायगड यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची असून मिळकतीचे विद्यमान मालक यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची असून निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी साधना भगवान मयेकर, वगैरे यांचे सदरहू मिळकती वरील त्यांचे ४/५ हिश्श्याचे क्षेत्रा बाबत मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. सबब, याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, लिन, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख २४.०७.२०२४ **(ॲड. एस. वाय. बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसाने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.विजय कृष्णा पेढवी पत्ता मू.पो.डोलवी, ता.पेण, जि.रायगड, यांनी जमिन मालक श्री. रविंद्र सदाशिव पाटील, पत्ता,वाशिनाका, ता.पेण. जि.रायगड यांचेकडून कायमस्वरूपी जमिन मिळकत खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

गाव	सर्व्हे नं/गट नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पै)
मौजे वडगाव ता.पेण, जि.रायगड	५/२	०-७७-९ बिनशेती	१७.३७
		पैकी क्षेत्र ०-०२-८२	

वर वर्णन केलेली संपूर्ण बिनशेती जमिन मिळकतीचे क्षेत्रापैकी सामाईकातील हिस्सा क्षेत्र ०-०२-८२ हे.आर इतके क्षेत्र आमचे अशिल कायमस्वरूपी रजिस्टर खरेदीखताने विकत घेत आहेत.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून २० (वीस) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवुन माझी खात्री पटवुन द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण सही/-
दि. २५/०७/२०२४ **ॲड. उमेश वामन पाटील**
पत्ता-मू.पो.कांदळेपाडा
ता.पेण,जि.रायगड
मो.९८२२६२६११८

ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर नोटीस

दि.२४/०७/२०२४

जा.क्र.१०२३/२०२४

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतराणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	प्रभाग क्रमांक	मालमत्ता क्रमांक	मालमत्तेचे ठिकाण	मालमत्तेचे वर्णन	ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव
१	२	३	४	५	६	७
१	२	७९०/५	जेधे स्मृती अपार्ट	आर सी सी पक्के सिमेंट बांधकाम सदनिका	विष्णू धोंडू भुसारी	अलका विष्णू भुसारी
२	६	२०८१/१७	ओम वक्रतुंड रेसि	आर सी सी पक्के सिमेंट बांधकाम सदनिका ७०६ चौ.फुट	मंदार एन्टरप्रायझेस तर्फे रमेश कापरे	सिपल सहानी
३	४	१९७८	गोंधळपाडा	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १३४४ चौ.फुट	नारायण रामचंद्र साळुंके	विकास दिनानाथ पानसरे
४	१		रुजाता रुपाली सोसा.	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फुट	शंकर डोळस	पांडुरंग तुकाराम दळी सुजाता पांडुरंग दळी
५	३	१७८७-६	शिवलोक सोसा.	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फुट	किरम सिताराम पाटील	राकेश पंडित चोरे
६	३	८४९-५	प्रभात नगर सोसा.पंतनगर	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ५७३ चौ.फुट	राजेंद्र गजानन गुंजाळ	करुणा विकास पडते
७	२	१०५/७	सोनल अपार्टमेंट	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ५६२ चौ.फुट	शांती रतन मुजुमदार	राहुल रतन मुजुमदार, शांती रतन मुजुमदार
८	४	१४७५/११	गौरीनंदन हौ.सोसा.	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फुट	पिटर दिना चावीस	विनोदिनी पिटर चावीस व इतर
९	४	१६८२/७	सिंगल रेसि.	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ६६४ चौ.फुट	वामन नथुजी इलमकर, सौ. विपर्णा वामन इलमकर	अमितकुमार रश्मी ओसवाल
१०	४	१८२४/१	सी शेल सोसा. गोंधळपाडा	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४५२+५५ चौ.फुट	विजयकुमार जयंतीभाई वसोया	प्रदिप रामचंद्र लवटे
११	६	९५०/५	प्रभात दर्शन हौ. सोसा	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ५४९ चौ.फुट	वैभव मसनाजी पाटील, वैष्णवी वैभव पाटील	किसन नामदेव राजभोज
१२	३	१७२०/२	ओमकार सोसा	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ५८५ चौ.फुट	अनिल कमलाकर राठोड, कमलाकर हरिश्चंद्र राठोड	अनिल कमलाकर राठोड
१३	४	८३२/१	ज्वेल्स ऑफ अलिबाग सोसा	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३५५ चौ.फुट	अनिल कमलाकर राठोड कमलाकर हरिश्चंद्र राठोड	अनिल कमलाकर राठोड
१४	४	८३१/३	ज्वेल्स ऑफ अलिबाग सोसा	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ५४५ चौ.फुट	अनिल कमलाकर राठोड, कमलाकर हरिश्चंद्र राठोड	अनिल कमलाकर राठोड
१५	५	१११२/५	स्वामी दर्शन अपार्ट	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ५३४ चौ.फुट	राजेश गजानन दिवेकर	श्रीनिवास नंदकुमार म्हात्रे
१६	५	१५२०	पिंपळभाट	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ५८५ चौ.फुट	अशरफ अब्दुल गफार अनवारे	सिरिन अशरफ अनवारे
१७	५	१२९३/५	अनुप्रभा सह.संस्था	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ६०० चौ.फुट	संतोष मरबा खोत	हर्षला प्रशांत टिपुकडे
१८	२	१४४०/७	कमळकुंज सोसा.	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ७६० चौ.फुट	मयुरी अनिल वाडकर	तेजस नारायण पाटील

श्री. निलेश लक्ष्मण गावंड
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत चेंढरे
ता. अलिबाग, जि. रायगड

सौ. स्वाती सतिश पाटील
सरपंच
ग्रामपंचायत चेंढरे
ता. अलिबाग, जि. रायगड

दरडी रोखण्यासाठी ग्रामपंचायतींचा पुढाकार

आठ लाख बांबूंची लागवड

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्ह्यात दरडीचा धोका वाढत आहे. गावे, वाड्या दरडीखाली येऊन मोठी वित्तहानी व जिवीतहानी होण्याची भिती निर्माण झाली आहे. दरडी रोखण्यासाठी बांबू लागवडीचा पुढाकार जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी घेतला आहे. गावे, वाड्यांजवळ असलेल्या मोकळ्या जागेत आठ लाख बांबूच्या झाडांची लागवड केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाने दिली आहे.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजार असून गावांची संख्या १ हजार ८००हून अधिक आहे. जिल्ह्यात ८१० ग्रामपंचायती असून अनेक गावे, डोंगर टेकडीच्या लगत आहेत. अनेक वाड्या डोंगरावर व पायथ्याशी आहेत. जिल्ह्यात औद्योगिकरण झपाट्याने वाढत असताना नागरिकीकरणदेखील वाढू लागले आहे. त्यामुळे झाडांच्या कत्तलीच्या प्रमाणात वाढ होत आहे. यातच डोंगरच्या डोंगर पोखरली जात आहेत. त्याचा परिणाम पावसाळ्यात बसू लागला आहे. अतिवृष्टीमुळे अनेक डोंगरावरील माती, दगड खाली येऊन गावे, वाड्या नष्ट होऊ लागले आहेत. जिवीतहानी, वित्तहानीचे संकट वाढत आहे. जिल्ह्यात दोनशेहून अधिक गावे, दरडीच्या छायेत आहेत. दरड रोखण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न केले जातात. तसेच, दरडग्रस्त गावांतील नागरिकांचे पावसाळ्यात स्थलांतर केले जाते. मात्र, दरडीवर ठोस उपाय नसल्याने दरडीचे संकट कायमच दिसून येत आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या आवाहनानंतर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी दरड रोखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. ग्रामपंचायत हद्दीतील गावे, वाड्यांच्यालगत असलेल्या डोंगरावर टेकडी व अन्य मोकळ्या जागेत बांबूची लागवड करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना आठ लाख बांबू लागवडीचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. त्यानुसार ही यंत्रणा कामाला लागली आहे. महाड, पोलादपूरसह अनेक तालुक्यांतील दरडग्रस्त गावांनजीक डोंगरावर बांबूची लागवड करण्यात आली आहे. आतापर्यंत जिल्ह्यात २१४.८९ एकर जागेत बांबूची लागवड करण्यात आली आहे. बांबू लागवडीतून जमीनीची धुप रोखण्यासाठी बांबू लागवड महत्वाची ठरत असल्याने ग्रामपंचायतीमार्फत ८ लाख बांबूची लागवड केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाकडून देण्यात आली आहे.

■ २१४.८९ एकर जागेत लागवड पूर्ण

> बांबूची मुळे माती धरून ठेवतात. जमीनीची धुप रोखली जाते. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर बांबू लागवड करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. आतापर्यंत ८७ हेक्टर क्षेत्रामध्ये ८० हजार बांबूची लागवड केली आहे.
>
> – राजेंद्र भालेराव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप ग्रामपंचायत विभाग

रिद्धीला ‘अभिनयाचे बक्षिस’

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अनंत सांस्कृतिक कलामंच पेझारी-अलिबाग संस्थेच्या ‘एका चित्राची गोष्ट’ बालनाट्यातील रिद्धी पिंगळे हिला ‘अभिनयाचे बक्षिस’ मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. सोमवारी (दि.२३) मुंबई येथील यशवंत नाट्य मंदीर येथे महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित ६२ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा व २० वी बालनाट्य स्पर्धा प्राथमिक फेरीतील पारितोषिक विजेत्या कलाकारांचा जेष्ठ रंगकर्मी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान सोहळा पार पडला.

या स्पर्धेत अनंत सांस्कृतिक कलामंच पेझारी - अलिबाग या संस्थेच्या एका चित्राची गोष्ट या नाटकातील सर्व बालकलाकारांनी उत्कृष्ट, अभिनय, नृत्य करून प्रेक्षकांची दाद मिळवली. या नाटकाचे लेखन अरविंद लिमये यांनी केले असून राजन पांचाळ यांनी बालनाट्याचे अतिशय उत्कृष्ट रीत्या दिग्दर्शन केले आहे. राजेंद्र म्हात्रे यांनी संगीतबद्ध केले आहे. नेपथ्य प्रमोद पाटील, देवेंद्र पाटील, तुषार पाटील यांनी नाटकाला साजेसेच केले होते. हितेश पवार यांची रंगभुषा जबरदस्त होती. मनस्वी पिंगळे यांनी नृत्य अप्रतिम बसवले होते. रंजन यांचे पार्श्वसंगीत खुपच छान होते. राजन पांचाळ यांची प्रकाश योजना नाटकाला साजेसी होती, तर वेशभुषा रश्मी पांचाळ यांची होती. रंगमंच व्यवस्था उपासना जुईकर, सुहास पाटील यांनी केली. नाटकाला मिळालेल्या यशाबद्दल खारेपाट विभागातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. या नाटकाचे निर्माता विकास जाधव, सूत्रधार आणि व्यवस्थापन देवेंद्र केळूसकर, ध्वनीमुद्रण वरुण भगत माऊली स्टुडिओ पेझारी- अलिबाग हे होते. या नाट्यातील कलाकार रिद्धी पिंगळे, श्रावणी भगत, आद्या म्हात्रे, चिराग पाटील, भाग्येश निकम, चिराग पाटील, सारा परेकर, श्रावणी सुतार, ओवी पाटील,अशील राऊत, ओवी म्हात्रे, विरा नरबेकर, श्रवण जुईकर, प्रियल अडिवरेकर या बालकलाकारांनी उत्कृष्ट भुमिका सादर केल्या. माजी आ. पंडित पाटील, शेकाप रायगड महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, विक्रांत वार्डे, देवेंद्र केळूसकर, राजन पांचाळ यांनी रिद्धी पिंगळे आणि बालकलाकारांचे अभिनंदन केले.

पान १ वरून

राजिपचा निधी पडून

परिषदेद्वारे घरोघरी पोहचविण्याचा प्रयत्न केला जातो. रायगड जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी, सदस्यांचा कार्यकाल मार्च २०२२ संपला. त्यानंतर प्रशासन राज सुरु झाले. गेल्या दोन वर्षापासून ग्रामीण भागांचा कारभार प्रशासनामार्फत चालत आहे.

जिल्ह्यात दोन हजारहून अधिक गावे आहेत. या गांवाबरोबरच वेगवेगळ्या वाड्या वस्त्या ठिकठिकाणी आहेत. जिल्हा परिषदेच्या अखत्यारित पाच हजार किलो मीटरहून अधिक रस्ते आहेत. जिल्ह्यातील गावे, वाड्यापर्यंत रस्ते पोहचले आहेत. गावे, वाड्या वस्त्यांमधील रस्ते चांगले होतील, अशी अपेक्षा रायगडकरांना होती.

परंतु जिल्ह्यातील काही गावे, वाड्यांमध्ये डांबरी रस्त्याच्या जागी पेव्हर ब्लॅकचे रस्ते तयार केले आहेत. परंतु पेव्हर ब्लॉकचे ठोकळे पावसात उखडू लागले आहेत. अतिवृष्टीमुळे काही रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. ठिकठिकाणी खड्डयांचे साम्राज्य आहे.

जिल्ह्यातील रस्ते दुरुस्ती व नूतनीकरणासाठी जिल्हा परिषदेचा निधी अपूरा पडत आहे. त्यामुळे रस्ते दुरुस्ती व नूतनीकरणासाठी बांधकाम विभागाने जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी केली.त्यानुसार रस्त्याच्या ३१६ कामांसाठी ४० कोटी ७१ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून ३८ कोटी १२ लाख रुपयांचा निधी जिल्हा परिषद बांधकाम विभागाला देण्यात आला. मात्र जून अखेरपर्यंत बांधकाम विभागाने रस्त्याच्या दुरुस्तीसह नूतनीकरणासाठी फक्त १६ कोटी रुपयांचा निधी खर्च केला आहे. त्यात इतर जिल्हा मार्ग अंतर्गत कामांसाठी ४९ टक्के व ग्रामीण रस्ते अंतर्गत कामांसाठी ३९ टक्केच काम पूर्ण झाले आहे.

निधी अभावी रस्ते दुरुस्त होऊ शकत नाही, अशी ओरड जिल्हा परिषद बांधकाम विभागाची कायमच राहिली आहे. परंतु शासनाकडून इतका निधी उपलब्ध होऊनही तो खर्च नक्की कुठे झाला असा प्रश्न जिल्ह्यातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

ग्रामीण भागातील जनतेची रस्त्याबाबत फार मोठी निराशा झाल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून येत आहे. अनेक गावे, वाड्यांमधील रस्ते खड्डेमय आहेत. काही रस्त्यांची कामांचा दर्जा चांगला नसल्याने नागरिकांची मोठे हाल होत आहेत. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचा कारभार उपअभियंता राहुल देवांग यांच्याकडे कार्यकारी अभियंता म्हणून सोपवण्यात आला आहे. खड्डेमय रस्त्याकडे जिल्हा परिषद बांधकाम विभाग कधी लक्ष देणार असा प्रश्न नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

महाविकास आघाडी कायम

यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सभापती तथा तालुका चिटणीस महादेव दिवेकर, सुरेश खैरे, पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, पी.डी.पाटील, सुप्रिया पाटील, शंकरराव म्हसकर, पनवेल नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, राजेश कोरडे, राजेंद्र सानप, प्रल्हाद पाटील यांच्यासह मोठ्या प्रमाणात शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यापुढे जयंत पाटील म्हणाले की, शेतकरी कामगार पक्षाचे नेते पक्ष सोडून जातात. परंतु कार्यकर्ते कधीच पक्षापासून दूर जात नाहीत. आजच्या उपस्थितीवरून हेच अधोरेखित होत आहे. तसेच अतुल म्हात्रे यांची उमेदवारी जाहीर केली नसली तरी अतुल म्हात्रे पक्षाच्या वरिष्ठ पक्ष संघटनेत काम करत असताना आपल्याला दिसणार आहेत. त्याची इच्छा नसतानादेखील मी त्याला पेणमध्ये आणले आहे, तेही सर्वसामान्य पेणकरांच्या हितासाठीच. पेणमध्ये कमीत कमी १५० बिल्डर पेणमध्ये तो तयार करणार आहे. आता येणाऱ्या एमएमआरडीए, नैना या प्रकल्पांसाठी अतुल म्हात्रेसारखाच माहितगार व उच्चशिक्षित माणूस पेणकरांना हवा आहे, असेही त्यांनी सांगितले. शेवटी जयंत पाटील यांनी पंढरपूर येथील शेतकरी कामगार पक्षाच्या अधिवेशनासाठी सर्व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले. तर येणाऱ्या विधानसभेला पेणमध्ये शेतकरी कामगार पक्षाचाच आमदार असेल असे ठाम अतुल म्हात्रे यांनी मांडले. हे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, निवडणुकीमध्ये जय पराजय हा होतच असतो. मात्र आज मी ठामपणे एक गोष्ट सांगतो

विजेच्या धक्क्याने म्हैस मृत्यूमुखी

यादव यांचा दुग्ध व्यवसाय आहे. त्यांच्या तबेल्यात असलेल्या म्हशी दररोज काहीवेळेसाठी तबेल्यातून बाहेर नेल्या जातात.पेशवाई रस्त्याने जात असताना त्यातील एक दुभती म्हैस ही रस्त्याच्या कडेने जात असताना त्या म्हशीच्या अंगावर विजेची तार कोसळली. त्यावेळी वीज वाहिनी सुरू असल्याने कोसळलेल्या विजेच्या तारेचा धक्का त्या म्हशीला बसला आणि त्यात त्या म्हशीचा मृत्यू झाला. लक्ष्मी ऑर्किड गृह संकुलाच्या पुढे हा अपघात झाला असून या अपघातात म्हशीचा मृत्यू झाल्याने सुखदेव यादव या दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. मृत म्हैस ही दुभती असल्याने संबंधित शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. त्याबाबत नेरळ मंडळ अधिकारी कार्यालयातील तलाठी यांनी पंचनामा पूर्ण केला असून महावितरण कंपनीनेदेखील या घटनेची नोंद घेतली आहे. महावितरणकडून संबंधित म्हशीच्या मृत्यू प्रकरणी पंचनामा करून शेतकऱ्याला मदत देण्यासाठी सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.

माणगावने वृक्षलागवडीत गाठला उच्चांक!

झुडपे नष्ट होत आहेत. त्याचा परिणाम जंगलातील पशु, पक्षी, प्राण्यांवर होत आहे. दरवर्षी शासन पावसाळ्यात वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात करते. त्यांपैकी कांही झाडे जगतात. तर काही मरतात. त्यातच वणव्याचाहि फटका त्यांना बसतो. निसर्ग व जमिनीचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड काळाची गरज आहे. माणगाव तालुक्यात यंदाचे वर्षी १ लाखाहून अधिक वृक्ष लागवड करून उच्चांक गाठला आहे. तर ६ दरडग्रस्त गावात बांबू लागवड मोठ्या प्रमाणात करून डोंगर व जमिनीची होणारी धूप थांबव्यासाठी बांबूच्या बेटांनी जाळे विणण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले आहे.

माणगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप जठार व प्रभारी कृषी अधिकारी अशोक मारकड, कृषी विस्तार अधिकारी शिवदत्त परजणे तसेच माणगाव वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी अनिरुद्ध ढगे यांचे नियोजन व मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली आहे. माणगाव पंचायत समितीने यंदाचे वर्षी ६० हजार झाडांची रोपे उपलब्ध करून दिली आहेत. एका ग्रामपंचायतीला ७९० रोपे लागवडीचे उदिष्ट दिले होते. माणगाव तालुक्यात ७४ ग्रामपंचायती व १ नगरपंचायत आहे. त्यादृष्टीने नियोजन करून वृक्ष लागवड करण्यात आली. ही रोपे पहेल येथील सामाजिक वनीकरण रोपवाटिका येथील नर्सरीतून आणून त्या रोपांची लागवड केली आहे. यात जंगली, सावली, फळ, करंज, सीताफळ, कांचन, गुलमोहर, आंबा, काजू अशी विविध रोपांची लागवड केली आहे. तर माणगाव तालुक्यातील ६ संभाव्य दरडग्रस्त गावे पहेल, गारळ, आडघर, रेपोली, न्हावे, टोळखुर्द हि सहा गावे भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण यांनी जाहीर केलेली हि गावे संभाव्य दरडग्रस्त असून या गावात स्थानिक नर्सरीतून बांबूची रोपे न घेता भोर, पुणे येथील नर्सरीतून सुधारित बांबूची जात थाई तुल्डा, इंडियन तुल्डा या दोन्ही जातीची हि झाडे ३ वर्षीची असून सुमारे ७ ते ८ फुट उंचीची आहेत. याची लागवड केली जाणार आहे.

वनविभागाने यंदा ४५ हजार विविध झाडांची लागवड शासनाच्या वनविभाग व मुंबई- गोवा महामार्गालगतच्या जागेत केली आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणामुळे तसेच जीर्ण झालेली अनेक झाडे नष्ट झाल्याने महामार्गाच्या दोन्ही बाजूनी वृक्षांची लागवड केली आहे. यामध्ये वड, करंज, तामण, पिंपळ, चीवन, आवळा, पळस, बांबू, जांभूळ, फणस, आंबा यासारखी विविध फळ व सावली देणारी वृक्षाची लागवड केली आहे. या लागवड केलेल्या वृक्षांना काटेरी कुंपण केली आहे. त्यामुळे आगामी काळात हि वृक्ष अधिक बळकट होणार आहेत. माणगाव तालुक्यात वनविभाग व पंचायत समितीने नियोजन केल्याने माणगाव तालुक्याने वृक्ष लागवडीत उच्चांक गाठला आहे.

एसटी चालकाची स्टंटबाजी

मागणी वंचित बहुजन आघाडी तर्फे करण्यात आली असून पाली बस स्थानकात असे निवेदनदेखील देण्यात आले आहे. पुलावरून जाणाऱ्या एसटी बसचा हा व्हिडीओ समाज माध्यमांवरदेखील व्हायरल झाला आहे. व्हिडिओ पाहणारे तसेच यावेळी उपस्थित प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी याबाबत संताप व्यक्त केला आहे. चालक व वाहक यांच्या बेदरकार वर्तनाबाबत कारवाई करण्यात यावी असेदेखील बोलले जात आहे.

पुलावरून पाणी जात असतानादेखील धोकादायकरित्या येथून बस नेताना मी स्वतः व पुलाच्या दोन्ही बाजूला उपस्थित नागरिकांनी पाहिले आहे. अशाप्रकारे प्रवाशांच्या जीवाशी खेळ करणे खूप निंदनीय आहे. त्यामुळे संबंधित चालक व वाहक यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे. त्यांचे निलंबन न केल्यास वंचित बहुजन आघाडीतर्फे तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा रायगड वंचित बहुजन आघाडी युवक अध्यक्ष अमित गायकवाड यांनी दिला आहे.

पाहिजेत

वामन हरी पेठे ज्वेलर्स अलिबाग शाखेसाठी सेल्स एग्जिक्युटिव पाहिजेत.

पात्रता :- कोणत्याही शाखेचा पदवीधर.
अनुभव असल्यास प्राधान्य.
प्रत्यक्ष भेटण्यासाठी रविवार दिनांक २८/०७/२०२४
वेळ : सकाळी ११ ते ४.०० वाजेपर्यंत.

संपर्क :- ०२१४१ २२१४७७/ ९९६०५४२६१३

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **सेल्समन पाहिजे : अलिबाग येथे हुशार मेहनती व स्वतःची मोटरसायकल असलेला सेल्समन हवा आहे. पगार- दहा हजार व इतर सुविधा. संपर्क : ९४२२६९६२३५**
- Requires DTP operator- Male/Female expert in English Typing/major work From Home- send cv on drssphulari@gmail.com with salary Expectation.
- **नागाव मधील हॉटेलमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत. ऑलराऊंड कुक, कुक हेल्पर, कॅप्टन, वेटर, मोरीवाला, मंडईवाला इत्यादी. मो. ७८२२०८३३८१**
- **अलिबाग ब्राह्मण आळी, युनियन बँकेशेजारील नवीन इमारतीमधील ९५० व ५०० स्क्वे. फूट क्षेत्रफळाचे दोन व्यापारी गाळे एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. ९९७०६६६२०३**
- **कुकूचकू पोल्ट्री फार्म प्रा.लि. निझामपूर, माणगाव येथे हॅचेरी व ब्रीडर फार्म येथे १२ वी शिकलेले मुलगे सुपरवायझर्स पाहिजेत. पगार : १२०००/- ऑफिसमध्ये १५ वी शिकलेले मुलगा मुलगी पाहिजे. पगार १५,०००/- संपर्क- अनुष्का राऊत ७७९८८८३८६४**
- **झिराड आणि मांडवा येथील पिकअप व 407 वर ड्रायवर हवा आहे. पगार रू. १५०००-१८००० Mob : 9421954348**

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

महाराष्ट्र शासन
महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)
Email :- mahad.ee@mahapwd.gov.in ph. No.(02145)222167

निविदा सूचना क्रमांक ११ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन- ४०२३०१, दूरध्वनी क्रमांत ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in. या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

अनु क्रमांक	कामाचे नाव	कामाची अंदाजित किंमत	इसारा/बयाणा रक्कम	ई-निविदा संचाची किंमत	काम पूर्ण करण्याचा कालावधी	नोंदणी वर्ग
१	२	३	४	५	६	७
१	माटवण जुवळे मोहल्ला सवाद माटवण येथे बहुउद्देशिय निवारा केंद्र बांधणे, ता. पोलादपूर, जि. रायगड II Call	३९०२४०२४.००	१३२०००.००	२३६०/-	१२ महिने	आवश्यकता नाही
२	दिवेआगर येथे पर्यटन मार्केट सुविधा तयार करणे ता. श्रीवर्धन जि.रायगड	१८४५१६५३/-	१५००००.००	११८०/-	१२ महिने	आवश्यकता नाही
३	हरिहरेश्वर येथे सभामंडप बैठक व्यवस्था सैल्फी पाँईट तयार करणे ता. श्रीवर्धन जि. रायगड	१४५०६३७९/-	१४६०००.००	११८०/-	१२ महिने	वर्ग चार

ई निविदेचे वेळापत्रक

१	निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ	दिनांक २४-०७-२०२४ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक ३१-०७-२०२४ वेळ १८.०० वाजेपर्यंत
२	निविदापुर्व बैठक	मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग कोंकण, मर्झबान रोड फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक २५-०७-२०२४ वेळ १२.०० वाजता अ.क्र. १ करीता मा. अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक २५-०७-२०२४ वेळ ०३.०० वाजता. अ.क्र. २ करीता
३	ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास)	अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोंकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ०२-०८-२०२४ वेळ १२.०० वाजता

टिप :- परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in. या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळावरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३३१७
दिनांक : २२-०७-२०२४

सही/-
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग, जि. रायगड.
-: २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना :-
(फक्त सभासदांसाठी)

सप्रेम नमस्कार,

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग या संस्थेच्या सभासदांना कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. १० ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता क्षात्रैक्य चौकळशी माळी समाज सभागृह, कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड या ठिकाणी खालील विषयांचा विचार करण्या करीता आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

-: सभेपुढील विषय :-

१. मागील दि. ०८ ऑगस्ट २०२३ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभा इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि.३१ मार्च २०२४ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या निव्वळ नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहिर करणे.
४. सन २०२४-२५ या सालाकरिता अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२३-२४ या सालाकरिता तयार केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५. सन २०२३-२४ या सालाचा वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून आलेला तपासणी अहवाल वाचून नोंद घेणे व स्विकृत करणे.
६. सन २०२४-२५ या सालाकरीता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे
७. मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल सादर करणे व त्यास मंजूरी देणे.
८. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. नविन शाखा विस्तार करणे बाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.
१०. संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस मंजूरी देणे.
११. प्रशिक्षण/कर्ज/गुंतवणूक/वसूली इत्यादी तत्सम विषयांच्या आर्थिक धोरणांना मान्यता देणे.
१२. संस्थेच्या संचालक मंडळाने मंजूर केल्याप्रमाणे संस्थेच्या खोपोली शाखेसाठी नविन स्वमालकिची जागा खरेदी करण्यास अंतीम मंजूरी देणे.
१३. नियम ४९ नूसार कर्ज निर्लेखनास मान्यता देणे.
१४. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ :- अलिबाग
दिनांक :- २५/०७/२०२४
सभासद प्रशिक्षण :- वार्षिक सभा सुरू होण्यापूर्वी याच ठिकाणी दु. ०३ ते ०४ या वेळेत सभासदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. कृपया सभासदांनी दु.०३ वाजता उपस्थित रहावे.
यानंतर लगेचच वार्षिक सभेचे कामकाज सुरू होईल.

मा.संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
(सौ.मीनाक्षी शामसुंदर पाटील)
कार्यलक्षी संचालिका
आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग

-: सूचना :-

१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सदरची वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्धा तास उशिरा म्हणजेच सायं. ४.३० वाजता घेतली जाईल व या सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२.ज्या सभासदांनी अजूनही आपले मोबाईल कमांक संस्थेकडे नोंदविले नाहीत किंवा ज्यांचे मोबाईल नंबर बदलले आहेत अशा सभासदांनी कृपया संस्थेच्या जवळच्या शाखेमध्ये संपर्क करून आपले मोबाईल नंबर अपडेट करणे व आपली केवायसी अपडेट करण्यास विनंती.
३.सन्माननीय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या आपल्या लेखी सूचना संस्थेच्या मुख्य कार्यालयाकडे वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किमान आठ दिवस अगोदर पाठवाव्यात.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर नोटीस

कर्जत वॉटर्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., माणकिवली, पो. बारे, कर्जत मुरबाड हायवे, ता. कर्जत, जि. रायगड या सहकारी संस्थाचा सन २०२४-२०२५ ते २०२८-२८ या कालावधीकरिता निवडणूक कार्यक्रम दि. २५-०७-२०२४ रोजी संस्थेचे नोटीस बोर्ड व मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका, जि. रायगड यांचे कार्यालयात प्रसिद्ध करण्यांत आलेला आहे. नामनिर्देश अर्ज विक्री व स्वीकृती तसेच नामनिर्देशन पत्राची छाननी व नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे ठिकाण हे मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका, जि. रायगड, पत्ता- कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार भवन, मार्केट यार्ड दहिवलीतर्फे नीड, कर्जत, जि. रायगड आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव	नामनिर्देशनपत्र विक्री व स्वीकृती दिनांक	नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक	नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे दिवस	निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व निशाणी वाटप दिनांक	मतदान दिनांक, वेळ व स्थळ	मतमोजणी दिनांक, वेळ व स्थळ व निकाल जाहीर दिनांक
१	कर्जत वॉटर्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., माणकिवली,पो.बारे, कर्जत मुरबाड हायवे, ता. कर्जत, जि.रायगड	दि. २६-०७-२०२४ व दि.२९-०७-२०२४ ते ०१-०८-२०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत	दि.०२-०८-२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता	दि.०३-०८-२०२२ ते दि.१९-०८-२०२४ रोजी सकाळी ११.०० ते ०३.००	दि.२०-०८-२०२४ रोजी सकाळी ११.००	दि.०१-०९-२०२४ रोजी सकाळी ०८.०० ०८.०० ते सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत संस्थेच्या कार्यालयात.	दि.०१-०९-२०२४ रोजी मतदान संपल्यानंतर अर्ध्या तासाने मतमोजणी संपेपर्यंत व निकाल जाहीर- मतमोजणी पूर्ण झालेनंतर लगेच

सूचना : १) राखीव मतदार संघातील उमेदवाराने नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम अधिकाऱ्याकडील जातीच्या दाखल्याची छायांकित प्रत प्रमाणित करुन जोडणे बंधनकारक आहे. २) नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेल्या चिन्हांच्या यादीमधून चिन्हे निवडावयाची आहेत. ३) मतदान व मतमोजणीचे दिवस वगळून निवडणूक कार्यक्रम शासकीय/सार्वजनिक/स्थानिक सुट्ट्या वगळून सुरु राहील. ४) नामनिर्देशन पत्र शुल्क रु.१००/- आणि अनामत रक्कम अनुसुचित जाती/जमाती उमेदवारांसाठी रु. ३००/- अनुसुचित जाती/जमाती यांचे व्यतिरिक्त उमेदवारांसाठी रु. १०००/- राहील. ५) नामनिर्देशन पत्र हे उमेदवार स्वत:अथवा त्यांचे सूचक यांनीच जमा करणे आवश्यक आहे.

दिनांक :- २५-०७-२०२४
ठिकाण : कर्जत

सही/-
(सुनिल किसन दांगट)
निवडणूक निर्णय अधिकारी
कर्जत वॉटर्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., माणकिवली, पो. बारे, ता. कर्जत, जि. रायगड

सही/-
(बालाजी कटकदौंड)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी
तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जि. रायगड

मोदींच्या ढोंगाचे स्मारक

लोकसभा निवडणुकीत आपला पराभव झालेला नाही असा नरेंद्र मोदींचा दावा आहे. निवडणुकीच्या प्रचारात सर्वत्र मोदी-मोदी चालले होते. पण भाजप दणकून आपटल्यावर मात्र त्यांना एनडीए आठवली. एनडीएचा विजयच झाला आहे असे म्हणून मोदींचे पडलो तरी नाक वर चालू आहे. दुसरीकडे विरोधकांच्या खोट्या प्रचाराला मतदार बळी पडल्याचा दावा ते करीत आहेत. भाजप राज्यघटना बदलून दलितांसाठीच्या राखीव जागा काढून टाकणार आहे असा प्रचार विरोधकांनी केला व त्यामुळे आपण हरलो असे मोदी आणि मंडळी म्हणतात. प्रत्यक्षात घटना बदलणार हे भाजपचेच काही नेते म्हणत होते. त्यांना वेळीच मोदींनी गप्प बसवले नाही. दुसरे म्हणजे घटना बदलाची भीती हा केवळ एक मुद्दा होता. देशातील बेकारी आणि महागाई यामुळे लोकांमध्ये कमालीचा असंतोष होता. पण आपल्या काळात बेकारी वाढल्याचे मान्य करायला मोदी आजतागायत तयार नाहीत. अर्थसंकल्प सादर होण्याअगोदर रिझर्व्ह बँकेचा हवाला देऊन देशात चार कोटी रोजगार निर्माण झाल्याचे सध्या ते सांगत फिरत आहेत. बेकारी ही जर समस्या नसेल तर अर्थसंकल्पात निर्मला सीतारामन यांनी इतक्या ठळकपणे रोजगाराच्या योजना का मांडल्या आहेत याचे उत्तर मोदींनी द्यायला हवे. २०१४ नंतर त्यांनी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजनेची खिल्ली उडवली होती. देशातील गरिबीला काँग्रेस कशी जबाबदार आहे याचे स्मारक म्हणजे ही योजना असल्याचे ते म्हणाले होते. पण याच योजनेने त्यांना कोरोनामध्ये हात दिला. आता दहा वर्षे सत्तेत राहूनही ही योजना मोदींना बंद करता आलेली नाही. उलट ऐंशी कोटी लोकांना मोफत धान्य देण्याची योजना पुढची पाच वर्षे चालू राहणार आहे. हे मोदी यांच्या ढोंगाचे आणि नाकर्तेपणाचे स्मारक आहे असे म्हणायला हवे. अर्थसंकल्पातील रोजगारासाठी दोन लाख कोटींची तरतूद हेही त्यांच्या लबाडीचेच उदाहरण आहे.

उद्योगपतींपुढे लोटांगण

मुख्य म्हणजे निर्मला यांनी काल मांडलेली ही योजनादेखील जुनीच आहे. कंपन्या व कारखान्यातील शिकाऊ उमेदवारांना दिले जाणारे वेतन किंवा भत्ता यासाठी सरकारने अनुदान देण्याची योजना काँग्रेसच्या काळापासून अमलात आहे. महाराष्ट्रात लाडका भाऊ नावाने ज्याचा प्रचार सुरू आहे त्याबाबतचा कायदा काँग्रेसने १९७४ मध्ये केलेला होता. खुद्द मोदी सरकारने कोरोनानंतरच्या काळात अर्थव्यवस्थेला गती मिळावी यासाठी जी काही लाख कोटींची पॅकेजेस दिली होती त्यातही अशाच प्रकारची योजना समाविष्ट होती. बांधकाम किंवा इतर क्षेत्रातील नव्या कामगारांचे भविष्य निर्वाह निधीचे हप्ते केंद्र सरकार भरेल असे तिचे स्वरुप होते. खरे तर मोदींनी त्या योजनेचे ऑडिट करून किती रोजगार वाढले याचे आकडे जाहीर करायला हवेत. पण या सरकारला खरी माहिती दडपूनच टाकायची आहे. त्यामुळे कामगार व रोजगारविषयक सर्वेक्षणे कमी झाली आहेत. २०२१ ची जनगणना झालेली नाही. ती करण्याबाबत मोदी चकार शब्दही बोलत नाहीत.अर्थसंकल्पातील योजनेनुसार, दर महिन्याला तीन हजार रुपयांपर्यंतचा भविष्य निर्वाह निधीचा हप्त्याची परतफेड कंपन्यांना करणार आहे. याचा फायदा कामगारांना नव्हे तर मालकांना होणार आहे. कारण, यात त्यांचे पैसे वाचणार आहेत. हा लाभ ते कामगारांपर्यंत पोचवणार का हा खरा प्रश्न आहे. मालक लोक कामगारांना कामावर ठेवताहेत हे त्यांचे उपकार समजून सरकारने त्यांच्या पायावर लोटांगण घालण्याचा हा सर्व प्रकार आहे. कोणताही मालक उद्योग धर्मादाय चालवत नाही. कामगारांकडून तो पगार पुरेपूर वसूल करून घेतो. त्याला प्रोत्साहन देणे ही सरकारची राजकीय गरज आहे. केवळ भविष्य निर्वाह निधीचा एक हप्ता सरकार भरते आहे म्हणून कोणीही मालक कामगारांना पूर्ण पगार देत राहण्याची शक्यता नाही. त्यामुळे सरकारने कितीही दावे केले तरी यातून नक्की किती रोजगार वाढतील याबाबत उद्योगपतींनीही शंका व्यक्त केली आहे.

पॅकेजही बनावट

देशातील पाचशे कंपन्यांमध्ये एक कोटी तरुणांना पाच वर्षात शिकाऊ उमेदवार म्हणून संधी देण्याच्या योजनेबाबतही अनेक सवाल आहेत. या योजनेतील उमेदवारांना महिना पाच हजार रुपये भत्ता केंद्र सरकार देणार आहे. मात्र यापूर्वी अशा प्रकारच्या योजनांना खासगी क्षेत्राने कधीही प्रतिसाद दिलेला नाही. भारतीय खासगी उद्योगपती नवी गुंतवणूक करायला का तयार नाहीत असा संतप्त सवाल निर्मला यांनीच अनेकदा केलेला आहे. ते उद्योगपती आपल्या कंपन्यांमध्ये सरकार-प्रायोजित नोकऱ्या द्यायला राजी होणार नाहीत हे शाळकरी मुलगादेखील सांगू शकेल. पण सरकारला आपण काहीतरी केले असे दाखवायचे आहे. हजारो कोटींचे आकडे लोकांवर फेकायचे आहेत. कालच्या अर्थसंकल्पात आंध्र व बिहारवर जी मेहरबानी झाली आहे त्याबद्दलही अनेकांना भरवसा वाटत नाही. मुळात अर्थसंकल्प हा एका वर्षासाठीचा असतो. या दोन राज्यांना दिली जाणाऱ्या मदतीपैकी यंदाचा आकडा नक्की किती हे सांगणे कठीण आहे. उदाहरणार्थ, आंध्र प्रदेशाला नवीन राजधानी उभारण्यासाठी किंवा बिहारला रस्ते, विमानतळ, वैद्यकीय महाविद्यालये इत्यादी उभारण्यासाठी पैसे मिळणार आहेत. हे प्रकल्प एका वर्षात पूर्ण होणे शक्य नाही. त्यातही बिहारमधील वीज प्रकल्पाची घोषणा २०१४ मध्येच झाली होती. पण मोदी सरकारने दहा वर्षात काहीही केले नाही. याच मोदींनी बिहारसाठी २०१६ मध्ये सव्वा लाख कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. त्याचे पुढे काय झाले, तो निधी खरेच मिळाला का हेही या निमित्ताने जाहीर व्हायला हवे. महाराष्ट्र व इतर राज्यांना या अर्थसंकल्पात जवळपास ठेंगा दाखवण्यात आला आहे. मेट्रो किंवा तत्सम चालू प्रकल्पांसाठी या वर्षाकरिताची तरतूद ही केंद्राची जबाबदारीच आहे. त्यात विशेष काही नाही. याच न्यायाने उद्या पोस्ट किंवा रेल्वे खात्याच्या कर्मचाऱ्यांना पगार दिल्याबद्दलही मोदी आणि निर्मला श्रेय घेऊ शकतील. जिकडेतिकडे लबाडी करून लोकांवर खोट्या प्रचाराचा मारा करणे हे या सरकारचे वैशिष्ट्यच आहे.

विचार

उद्योगांची भारतवारी, मद्याची होम डिलिव्हरी

महेश देशपांडे

अर्थनगरीमध्ये अलिकडे वेगवेगळ्या रंगढंगाच्या लक्षवेधी बातम्या समोर आल्या. त्यातील देशासाठी महत्वाची बातमी म्हणजे चीनची अर्थव्यवस्था अडचणीत आल्याने अनेक मोठ्या कंपन्या भारतात येऊ घातल्या आहेत. दरम्यान, देशात कर्जाच्या तुलनेत ठेवींच्या प्रमाणात मोठी वाढ होत असल्याचे आढळून आले. एक धमाकेदार बातमी म्हणजे सहा राज्यांमध्ये मद्याची होम डिलिव्हरी सुरु होण्याची शक्यता आहे.

सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीत वेगवेगळ्या रंगढंगाच्या लक्षवेधी बातम्या समोर आल्या. त्यातील देशासाठी महत्वाची बातमी म्हणजे चीनची अर्थव्यवस्था अडचणीत आल्याने अनेक मोठ्या कंपन्या भारतात येऊ घातल्या आहेत. दरम्यान, देशात कर्जाच्या तुलनेत ठेवींच्या प्रमाणात मोठी वाढ होत असल्याचे आढळून आले. एक धमाकेदार बातमी म्हणजे सहा राज्यांमध्ये मद्याची होम डिलिव्हरी सुरु होण्याची शक्यता आहे. तर आणखी एक दखलपात्र रोजगारवृत्त म्हणजे फायनान्शिअल प्लॅनिंग सेक्टरमध्ये पुढील काळात १८ लाख नोकऱ्या उपलब्ध असणार आहेत.

चीनला जगातील सर्वात मोठी दुसरी अर्थव्यवस्था बनवण्यात मोठा वाटा असलेल्या 'ग्लोबल कंपन्या' आता चीनमधील अस्वस्थ सामाजिक परिस्थितीमुळे भारताकडे वळल्या आहेत. चीनची अर्थव्यवस्था सुस्तावली असून युरोप आणि अमेरिकेसोबत चीनचा तणाव वाढत आहे. त्यामुळे प्रगत राष्ट्रे चीनवरील अवलंबित्व कमी करू इच्छितात. 'ग्लोबल कंपन्या' आपली मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स चीनहून भारतात हलवत आहेत. चीनऐवजी इतर देशांमध्ये नवे कारखाने सुरू करत आहेत. भारत ही या कंपन्यांची पहिली पसंती आहे. जपानची वित्तीय कंपनी 'नोमुरा'नुसार चीनमध्ये मॅन्युफॅक्चरिंग बेस असलेल्या १३० जागतिक कंपन्यांपैकी सर्वाधिक २८ कंपन्या आपली उत्पादन युनिट भारतात हलवू इच्छितात. 'ग्लोबल कंपन्यां'च्या पसंतीमध्ये व्हिएतनाम दुसऱ्या तर मेक्सिको तिसऱ्या क्रमांकावर आहे. २०१९ मध्ये चीनमधून ग्लोबल कंपन्यांचे स्थलांतर सुरू झाले. 'ग्लोबल कंपन्या' भारतात आल्यास निर्यात २०३० पर्यंत वाढून ८३५ डॉलर्स (सुमारे ७० लाख कोटी रुपये) पर्यंत वाढू शकते. ही वार्षिक दहा टक्के वाढ आहे. २०२३ मध्ये भारताने ४३१ अब्ज डॉलर्सची (सुमारे ३६ लाख कोटी रुपये) निर्यात केली होती.

गेल्या वर्षी 'अमेरिकी चेंबर ऑफ कॉमर्स'ने चीनमध्ये चालवण्यात येणाऱ्या अमेरिकन कंपन्यांची पाहणी केली. त्यात ४० टक्के कंपन्या अमेरिका-चीनमधील तणावामुळे इतर देशांमध्ये स्थलांतरित होऊ इच्छितात, असे आढळले होते. त्यांच्यासाठी भारत हा चांगला पर्याय आहे. याचे कारण भारत हा मागणी, खप आणि लोकसंख्येत चीनसारखा आहे. कपाशी, लोखंड, केमिकल्ससारखा कच्चा मालही भारतात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. जगातील सर्वात मोठी रिटेल कंपनी वॉलमार्टही भारतात विस्तार करणार असून २०२७ पर्यंत भारतीय पुरवठादारांबरोबर आपली खरेदी १० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवू पहात आहे २०२० मध्ये ती तीन अब्ज डॉलर्स होती. उत्तर अमेरिका व युरोपीय देशांच्या रिटेलर्सनी काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशमध्ये कारखाना सुरू करण्याची शक्यता तपासली होती. उत्तर प्रदेशमध्ये कोट्यवधी अकुशल कामगार आहेत. जर्मन रिटेलर 'टेकपॉइंट'चे कार्यकारी संचालक उली सेरस म्हणाले की पुरवठ्यासाठी केवळ चीनवर अवलंबून राहणे योग्य नाही. भारताकडे वळावे लागेल. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या अध्यक्षीय काळात चीनच्या निर्यातीवरील दर वाढवला होता. नंतरचे अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी त्यात वाढ केली. आता कुणीही अध्यक्ष झाले, तरी ही स्थिती कायम असेल.

रोखीच्या तुटवड्याला तोंड देण्यासाठी बँकांच्या ठेवींवर व्याजदर वाढवण्याच्या धोरणाचे परिणाम दिसू लागले आहेत. गेल्या सहा महिन्यांमध्ये ठेवी आणि कर्ज घेण्याच्या ट्रेंडमध्ये मोठा बदल झाला आहे. या सहा महिन्यांमध्ये घेतल्या गेलेल्या एकूण कर्जाच्या तुलनेत बँकांमधील ठेवी सुमारे दीडपटीने वाढल्या आहेत. गेल्या १५ दिवसांमध्ये बँक ठेवींमधील रक्कम बँकांनी वितरित केलेल्या एकूण कर्जापेक्षा अडीचपट अधिक होती. 'केअरएज रेटिंग्स'च्या मते बँकांमध्ये एकूण ३.९ लाख कोटी रुपये जमा झाले. त्या तुलनेत फक्त १.७ लाख कोटी रुपयांचे कर्ज उचलण्यात आले. गेल्या सहा महिन्यांपासून हा बदल दिसून येत आहे. गेल्या एका वर्षात बँकांकडून एकूण २४.९ लाख कोटी रुपयांची कर्जे घेण्यात आली. बँकांकडून घेतलेल्या कर्जांमध्ये वार्षिक १३.८ टक्क्यांची वाढ झाली. गेल्या वर्षी जूनच्या शेवटच्या पंधरवड्यात कर्ज (क्रेडिट)वाढ १६.२ टक्के होती. याचा अर्थ वार्षिक आधारावर २.४ टक्क्यांची घट झाली आहे. वैयक्तिक कर्जासारख्या असुरक्षित कर्जांबाबत रिझर्व्ह बँकेचा कठोरपणा हे याचे सर्वात मोठे कारण आहे. हा ट्रेंड भविष्यातही कायम राहू शकतो. सध्या देशात क्रेडिट टू डिपॉझिट रेशो ८० टक्क्यांच्या उच्च पातळीवर आहे. कर्जाची मागणी पूर्ण करण्यासाठी बँकांना सतत नवीन ठेवींची आवश्यकता असते. हे पाहता सर्व सरकारी बँका १२-१५ महिन्यांच्या ठेवींवर सात टक्के किंवा त्याहून अधिक व्याज देत आहेत. खासगी बँकाही त्याच मार्गावर आहेत. त्यामुळे लोकांचा मुदत ठेवींकडे कल वाढला आहे. रेपो दर दीर्घकाळ ६.५ टक्क्यांवर स्थिर असूनही ठेवी वाढत आहेत.

आता दारू घरपोच मिळणार आहे. मद्य उद्योगाला चालना देण्यासाठी दारूची होम डिलिव्हरी सुरु करण्यात येणार आहे. झोमॅटो, स्विगी आणि बिग बास्केट या प्लॅटफॉर्म्सनीही यासाठीची तयारी सुरू केली आहे. दारूच्या होम डिलिव्हरीच्या पार्श्वभूमीवर देशातील सहा राज्यांनी प्रोजेक्टवर काम सुरू केले आहे. दरम्यान, हा निर्णय दारू उद्योगासाठी गेमचेंजर ठरण्याची शक्यता आहे. दिल्लीतील लोकांना लवकरच दारूची होम डिलिव्हरी मिळण्याची शक्यता आहे. ही व्यवस्था लवकरच संपूर्ण देशातील दारू उद्योगासाठी गेमचेंजर ठरु शकते. त्यासाठी सहाही राज्यांनी नियोजन सुरू केले आहे. दरम्यान, आर्थिक दृष्टिकोनातून विचार केल्यास विविध राज्यांच्या सरकारसाठी ही एक अनुकूल व्यवस्था आहे. कारण त्यांच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा दारूवरील करातून येतो. देशात दूरच्या ठिकाणी पेट्रोल, अन्न, रेशन, औषध, कपडे आणि शूजची होम डिलिव्हरी केली जात असेल, तर दारूचीही होम डिलिव्हरी होऊ शकते. कोविड संपल्यानंतर सुमारे तीन वर्षांनी लोकांच्या या गरजेला ठोस स्वरुप मिळणार आहे. दरम्यान, दिल्लीत लवकरच दारूची होम डिलीव्हरी केली जाणार आहे. प्रथम ते प्रायोगिक तत्त्वावर हे सुरू केले जाईल. दिल्ली व्यतिरिक्त कर्नाटक, हरियाणा, पंजाब, तमिळनाडू, गोवा आणि केरळ या राज्यांनीही यावर पायलट प्रोजेक्ट सुरू करण्याची योजना आखली आहे. कोविडकाळात प्रथम केरळ आणि कर्नाटकमध्ये अशी कल्पना मांडण्यात आली होती; परंतु त्यानंतर ती अंमलात आणता आली नाही.

देशातील बेरोजगारीबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. देशातील तरुणांना नोकऱ्या नाहीत, असे लोक म्हणतात; पण कधी कधी असे आकडे समोर येतात, ज्यामुळे लोक आश्चर्यचकित होतात. गेल्या वर्षी आर्थिक क्षेत्रात १८ लाख नोकऱ्या होत्या; परंतु चांगले उमेदवारच मिळाले नाहीत. 'फायनान्शियल प्लॅनिंग स्टँडर्ड्स बोर्डा'चे 'सीईओ' कृष्णा मिश्रा म्हणाले की वित्तीय सेवाक्षेत्रात रोजगाराची कमतरता नाही; परंतु वेगळी समस्या आहे, नोकऱ्या आहेत; पण त्या घ्यायला कोणी तयार नाही. गेल्या वर्षी वित्तीय सेवांमध्ये ४६.८६ लाख नोकऱ्या निर्माण झाल्या. यापैकी केवळ २७.५ पदे भरता आली असून उर्वरित १८ लाख पदे रिक्त आहेत. तरुणांमधील कौशल्याचा अभाव हे यामागील सर्वात मोठे कारण असल्याचे सांगितले जाते. नोकऱ्या आहेत; पण देशात पात्र लोकांची बरीच कमतरता आहे. ते पुढे म्हणाले की गुजरातमधील गांधीनगर येथे उभारण्यात येत असलेल्या 'गिफ्ट सिटी'मध्ये वित्तीय सेवा क्षेत्रात पुढील पाच वर्षांमध्ये सुमारे १.५ लाख लोकांना रोजगार असेल. बँका, विमा कंपन्या, ब्रोकरेज हाऊस आणि म्युच्युअल फंड कंपन्यांमध्ये नोकऱ्या नेहमीच उपलब्ध असतात. ऑनलाइन नोकऱ्या शोधत असणाऱ्यांना वित्तीय सेवा क्षेत्रात बहुतांश संधी उपलब्ध आहेत. नजिकच्या भविष्यकाळात एक लाख प्रमाणित आर्थिक नियोजकांची आवश्यकता असेल. भारतात अद्याप 'पर्सनल फायनान्स' गांभीर्याने घेतले गेलेले नाही. ती श्रीमंतांसाठी एक महत्वाची बाब मानली गेली आहे; पण भविष्यात प्रत्येकाला याची गरज भासणार आहे.

आजकाल

'लाडके शिक्षण संस्थाचालक' योजनेला चपराक

तुषार गायकवाड

महायुती सरकारच्या 'लाडके खाजगी शिक्षण संस्थाचालक' या अघोषित घटनाबाह्य योजनेला उच्च न्यायालयाची चपराक!

देशातील मुलांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण मिळावे या उदात्त हेतूने माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वातील युपीए सरकारने राईट टू एज्यूकेशन (Right To Education) म्हणजे शिक्षण हक्क कायदा केला. या कायद्याअंतर्गत विद्यार्थ्यांना सरकारी शाळांसोबतच नियमांच्या अधीन राहून खासगी शाळांमधूनही मोफत शिक्षण दिले जाते.

मात्र राज्यातील महायुती सरकारने राईट टू एज्यूकेशन कायद्याला हरताळ फासत घटनाबाह्य पध्दतीने अध्यादेश काढून बदल केला. हा बदल खाजगी शिक्षण संस्थाचालकांच्या फायद्याचा होता. तर सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना कायद्यात तरतूद असूनही खाजगी शाळेतील शिक्षणापासून वंचित ठेवणारा होता.

आरटीईच्या अंतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांत समाविष्ट कुटुंबातील मुलांना खाजगी शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवणे व त्या जागांवर प्रवेश देणे बंधनकारक होते. अशा शाळांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क शासनाकडून दिले जाते. उपलब्ध सार्वजनिक आकडेवारीनुसार राज्यात दरवर्षी सुमारे १,००,००० मुलांपेक्षा जास्त जागांवर आरटीई अंतर्गत प्रवेश घेतले जातात. मात्र महायुती सरकारने कायद्यातील हि तरतूद खाजगी शिक्षण संस्थाचालकांच्या फायद्यासाठी बदलण्याचा घाट घातला.

महायुती सरकारने शिक्षण हक्क नियम २०२४ नावाने एक अध्यादेश पारीत करुन आरटीई कायद्यात नवीन तरतुद केली त्यानुसार, ज्या खाजगी शाळेच्या १ किलोमीटरच्या परीसरात सरकारी शाळा आहेत, त्या खाजगी शाळांमधील आरटीईच्या २५ टक्के राखीव जागा रद्द करण्यात आल्या.

साहजिकच या २५ टक्के जागांवर खाजगी शिक्षण संस्थाचालकांना शैक्षणिक शुल्क आकारुन इतर मुलांना प्रवेश देणे सोपे झाले. तर यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलांना खासगी शाळांऐवजी सरकारी शाळांमध्ये सक्तीचा प्रवेश घ्यावा लागला. यामुळे सर्वसामान्य व गरीब विद्यार्थ्यांचे खाजगी शाळांमधील प्रवेशाचे स्वप्न अपूर्ण राहून खाजगी शिक्षण संस्थाचालकांचा खिसा भरला जाणार होता.

खाजगी शिक्षण संस्थाचालक आणि सत्ताधाऱ्यांचे अर्थकारण सर्वश्रृत आहे. मेडीयाने म्हणून तर खाजगी शिक्षण संस्थाचालकांना 'शिक्षणसम्राट' उपाधी बहाल केलेली आहे. त्यामुळे त्यावर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता नाही. महायुती सरकारच्या वतीने मात्र या निर्णयाबद्दल गोंडस कारण दिले की, 'पात्र मुलांना सर्वात जवळच्या शाळांमध्ये प्रवेश मिळावा, या उदात्त हेतूने आरटीई कायद्यात बदल केला आहे. यामुळे शिक्षण अधिकाराची व्याप्ती वाढणार आहे.' आता खाजगी शाळांतील प्रवेशच गोरगरीबांच्या मुलांना नाकारुन शिक्षण अधिकाराची व्याप्ती सरकार कोणत्या पध्दतीने वाढवणार होते? ते सरकारमधील 'साडेतीन' शहाणेच सांगू शकतात.

पण सरकारच्या या लाडके खाजगी शिक्षण संस्थाचालक निर्णयास आजरोजी मुंबई उच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवत सणसणीत चपराक दिली आहे. न्यायालयाने सुणावणीत म्हटले आहे की, हा निर्णय घटनाबाह्य आहे. तसेच घटनेतील अनुच्छेद २१ चे उल्लंघन करणारा आहे. त्यामुळे यापुढे विनाअनुदानित खाजगी शाळांनाही आरटीई अंतर्गत राखीव आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी आरक्षित असलेल्या २५ टक्के जागांवरील प्रवेश द्यावेच लागतील. यासंदर्भातील राज्य सरकारचे ६ मार्च रोजीचे परिपत्रकही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने रद्द केले.

यास्तव महायुती सरकारच्या 'लाडके खाजगी शिक्षण संस्थाचालक' या अघोषित घटनाबाह्य योजनेला उच्च न्यायालयाने सणसणीत चपराक दिली असेच म्हणावे लागेल. काँग्रेसने आणीबाणी लादून घटनेची हत्या केली, असे म्हणणारे विद्वान आता महायुती सरकारच्या निर्णयाला न्यायालयाने घटनाबाह्य ठरवल्यावर महायुती सरकारकडून 'घटनेचा विनयभंग' तरी म्हणतील का? हा प्रश्नदेखील उरतोच!

लोकसंसद

जगभरातील ४ कोटी लोक एचआयव्ही बाधित

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या एचआयव्ही/एड्स संदर्भातला अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. यामधील निष्कर्षानुसार २०२३ मध्ये जवळपास जगभरातील ४ कोटी लोकांना एचआयव्हीची बाधा झाली होती. एचआयव्ही बाधा झालेल्या यामधील जवळजवळ एक चतुर्थांश लोक म्हणजे ९३ लाख लोक वैद्यकीय उपचार घेत नव्हते. परिणामी एड्सशी संबंधित कारणांमुळे दर मिनिटाला एक मृत्यू झाल्याचे या अहवालात म्हटले आहे. विशेष म्हणजे किशोरवयीन मुली आणि तरुण स्त्रियांमध्ये एचआयव्हीचे प्रमाण वाढत असल्याचे निष्पन्न झाले आहे. २०१०-२०२२ या कालावधीत मुलांमधील एड्स संबंधित मृत्यूंची संख्या ६४ टक्क्यांनी कमी झाली होती. तरीही २०२२ मध्ये एचआयव्ही साथीच्या आजाराने अंदाजे ८४ हजार मुलांचा बळी घेतला असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. एकीकडे जागतिक एड्स साथीच्या रोगाचा अंत करण्यासाठी प्रयत्न चालू असताना निधीच्या कमतरतेमुळे नवीन संक्रमण वाढत आहे. मध्य पूर्व आणि उत्तर आफ्रिका, पूर्व युरोप आणि मध्य आशिया आणि लॅटिन अमेरिका या तीन प्रदेशांमध्ये अधिक संक्रमण होत आहे. या अहवालानुसार सार्वजनिक आरोग्य धोक्यात आणणाऱ्या या आजाराचे २०३० पर्यंत संपूर्ण उच्चाटन करण्याचे जागतिक उद्दिष्ट साध्य करायचे असल्यास काही कठोर निर्णय घेण्याची गरज आहे.

- प्रदीप शंकर मोरे

मराठी साहित्यिक दिनविशेष

२५ जुलै

वर्तमानकाळातील घटना रंगभूमीवर साकारणारे मराठीतील पहिले नाटककार, लेखक, कवी ना.बा. कानिटकर यांचा जन्म १८५२ साली झाला. प्राथमिक शिक्षण त्यांचे पुण्यात झाले. एल्फिन्स्टन हायस्कूलमधून मॅट्रिक झाल्यावर पुढे वकिलीची परीक्षा पास होऊन पुण्यात वकिली केली. लेखनाची आवड असल्याने आपला पेशा सांभाळून त्यांनी १० नाटके लिहिली. त्यात अनुवादित व ऐतिहासिक नाटकांप्रमाणे सामाजिक नाटकाचा समावेश आहे. त्यांचे सर्वात गाजलेले नाटक म्हणजे 'तरूणीशिक्षण नाटिका' या नाटकातून शिक्षणाचे स्त्रियांवर होणारे दुष्परिणाम दाखवल्याने तत्कालिन, रुढीप्रिय, सनातनी लोकांमध्ये ते लोकप्रिय ठरले. कानिटकरांनी तत्कालिन घटनांच्या आधारावर अनेक नाटके लिहिली. त्यात बडोदा संस्थानच्या विषप्रकरणी 'मल्हारराव महाराज', क्रॉफर्ड प्रकरणातील 'नाट्यविजय', संतती कायद्याचे नाटक आदींचा समावेश आहे. याशिवाय शिवाजी महाराज, बाजी देशपांडे, बाजीराव मस्तानी ही ऐतिहासिक नाटकेही त्यांनी रचली. त्याखेरीज शेक्सपिअरच्या 'रोमिओ अँड ज्युलिएट' वर आधारित' शशिकला आणि रत्नपाल' तसेच वॉल्टर स्कॉटच्या 'केनिलवर्थ' या कादंबरीच्या आधारे 'प्रतापराव आणि चंद्रानना' ही नाटके रचली. कानिटकरांनी 'अंजविताप' ही काव्यरचना आणि 'दिवाणी' काम शेतीविषयक कायदा' ही पुस्तकेही लिहिली. त्या काळातील ऐतिहासिक नाटकांच्या जमान्यात घरगुती संवाद योजना असलेली ऐतिहासिक नाटके लिहून त्यांनी आपले वेगळेपण स्पष्ट केले. चटकदार संवाद आणि प्रत्ययकारी प्रसंगचित्रण ही त्यांच्या नाटकांची वैशिष्ट्ये. त्या काळातील या लोकप्रिय नाटककराचे २५ जुलै १८९७ रोजी निधन झाले.**१८८७:-** कवी नागेश गणेश नवरे यांचा जन्म. त्यांच्या स्पुट कविता त्यावेळच्या प्रतिष्ठित नियतकालिकातून प्रसिध्द होत असत. **१९१७**:-कादंबरीकार, चित्रकार, इतिहाससंशोधक सदाशिव शंकर देसाई यांचा जन्म. 'इभ्रत','मी','आहुती','अब्बास अली','चंबळेच्या पलीकडे','अखेरची लढाई','निष्कलंक' या कादंबऱ्या तसेच 'टॉलस्टॉय स्मृती','सर विस्टन चर्चिल', 'कोंदणातले हिरे' ही चरित्रात्मक पुस्तके आणि 'पहिले महायुद्ध', 'स्टॅलिनगार्डची लढाई' ही इतिहासविषयक पुस्तके लिहिली. याशिवाय 'मराठयांच्या इतिहासाची साधने व शिवशाहीतील पोर्तुगीज कागदपत्रे' हे त्यांचे संशोधन प्रसिध्द झाले. देसाई यांचा इंग्रजी, फ्रेंच व पोर्तुगीज भाषा अवगत होत्या. वाई येथील मराठी विश्वकोशात ते कार्यरत होते. याशिवाय दै. प्रभात, लोकशक्ती, संयुक्त महाराष्ट्र, चित्रा आदी दैनिकात त्यांनी सहसंपादक म्हणून काम केले. 'करवीरचे ठत्रपती आणि पोर्तुगीत''मानवी, इतिहासातील महान क्षण','स्टॉलिनगाडची लढाई' हे त्याचे भव्य ग्रंथ. **१९२२**:-कवी, गीतकार, 'नवशाहीर, बालसाहित्यिक वसंत बापट यांचा जन्म. 'बिजली' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह सामाजिक वास्तवाला महत्त्व देणारा होता. राष्ट्रसेवा दलासाठी अनेक नाटिका लिहिणाऱ्या बापट यांचे भाषेवरील प्रभुत्व इतके होते की, 'चिंधीचे गाणे' सारखी चित्रपटगीते, जाहिराती, पोवाडे, समरगीते, 'झेलमचे अश्रू' सारखे गीत-नृत्यनाटय आणि प्रेमकाव्येही त्यांनी ताकदीने लिहिली. 'बारा गावचे पाणी' (प्रवासवर्णन) आणि जिंकूनि मरणाला (व्यक्तिचित्रे) असे गद्यलेखन त्यांनी केले. २००२ साली ते निवर्तले. **१९३४**:- मराठी साहित्याचा अभ्यास आशय व अभिव्यक्ती या दोन्ही अंगानी लेखन करणारे नामवंत समीक्षक, साहित्यिक दत्तात्रय भिकाजी कुलकर्णी यांचा जन्म. लेखनाची सुरुवात काव्य व कथालेखनाने. 'रेक्वियम' या कथेला आंतरराष्ट्रीय लघुकथेत पारितोषिक. 'मेघ, मोर आणि मैथिली' ह्या ललित लेखांच्या संग्रहासह १६ समीक्षात्मक पुस्तके त्यांनी लिहिली. त्यामध्ये 'दुसरी परंपरा', 'महाकाव्य: स्वरुप आणि समस्या','युगास्त्र' या सर्व ग्रंथातून द. मि. च्या वाङ्:मयीन विचारांचा व्यापक पैसे ध्यानात येतो. मानसशास्त्रापासून आयुर्वेदापर्यत संत तुकारामांपासून इंग्रजी साहित्यापर्यत आणि शिल्पकलेपासून ते उपनिषदांपर्यतचा व्यासंग त्यांचा आहे. **१९४१**:-कवी र. स. गिऱ्हेपुंजे यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'भावतुषार' हा भक्तिगीतसंग्रह आणि 'रससाम्राज्य' हा काव्यसंग्रह अशी साहित्यसंपदा. १९७१:- लेखक प्रशांत असडकर यांचा जन्म. 'मराठयांचा रोमांचकारी स्वातंत्र्यलढा' या पुस्तकातून त्यांनी इ.स. १६८० ते १७०७ पर्यतचा मराठयांचा रोमांचकारी इतिहास लिहिला आहे. **१९८३**:- 'लेखक आणि सत्यप्रकाश' या साप्ताहिकाचे संस्थापक त्रिंबक अण्णाजी उर्फ बाप्पा धारणकर यांचे निधन. १९९७:- उाम वक्ते, चित्रकार, कवी वसंत हिरालाल मातुरकर यांचे निधन. 'इंद्रधनू' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे.

संजय वझरेकर

RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १०, अंक २२(४)] गुरुवार, मार्च ७, २०२४/फाल्गुन १७, शके १९४५ [पृष्ठे १६, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ३७

प्राधिकृत प्रकाशन

उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडून

खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस.

क्र. उविअ/भूसं/कात-५/तळाशेत /एस आर-१६१/२०२१/२०२३.—ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांचेकडील पत्र जा.क्र.मवि/मशा/का-३(१)१११६, दि. २५/०४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचेकडे 'इंदापूर - पाचाड - दापोली राज्य महामार्ग क्र. ९७' च्या रुंदीकरणाकरीता **मौजे तळाशेत, ता. माणगांव येथील ०-३४-०१ हे. आर. चौ. मी.** क्षेत्र संपादन करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

त्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील आदेश क्र. भुसंपादन/टे-६ /इ.पा.म.क.वि.दा.रस्ता रा.मा.९७/२०२१, १६/०९/२०२१ अन्वये इंदापूर - दापोली - पाचाड राज्य महामार्ग क्र. ९७ च्या रुंदीकरणाकरीता प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या कामी महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे २०१५ व शासन परिपत्रक क्र. एलक्युएन -०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५/०१/२०१७ अन्वये **मौजे तळाशेत, ता. माणगांव, जि. रायगड येथील जमिनींचे क्षेत्र ०-३४-०१ हे. आर. चौ. मी.** संपादन करण्याचा प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त झालेला असून त्या करीता उप विभागीय अधिकारी, माणगांव यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडील वरील प्राप्त प्रस्तावानुसार **मौजे तळाशेत** या गावातील जमिनींचे राज्य महामार्ग क्र. ९७ चे रुंदीकरण या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासन निर्णय क्रमांक/संकिर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे २०१५ तसेच शासन परिपत्रक क्र. एलक्युएन -०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५/०१/२०१७ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने संपादित करण्यात येत आहे.

त्याअर्थी, आता

(१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनूसार मी, **डॉ. संदीपान सानप, उप विभागीय अधिकारी** माणगांव याद्वारे,

(एक) अनुसूची - १ मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांच्या नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे; आणि

(दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेडयुल - १ च्या तरतुदीनुसार निश्चित केलेल्या दराने संबंधीत जमिनीसाठी परिगणीत होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% वाढीव रक्कम देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

(तीन) संबंधीत भूधारकाकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे ' कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड ' यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) याव्दारे मागवित आहे.

(२) संबंधित भूधारकांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उप विभागीय अधिकारी, माणगांव यांच्याकडे दाखल करावीत.

(३) संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उप विभागीय अधिकारी, माणगांव यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयातील प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भुधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

(४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उप विभागीय अधिकारी, माणगांव यांच्या कार्यालयामध्ये व महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवणेंत आली आहे.

अनुसूची - एक

खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशील

तालुका : माणगांव जिल्हा : रायगड

अ. क्र.	गावाचे नाव	भूमापन क्रमांक/ गट क्रमांक	खरेदी करावयाचे क्षेत्र (हे. आर)
१	**तळाशेत**	१२४ पैकी	०-०१-४०
२		१३२ पैकी	०-००-२०
३		१३३ पैकी	०-०१-२०
४		१५० पैकी	०-००-७१
५		१५४ पैकी	०-०७-००
६		१९० पैकी	०-२३-५०
एकूण			**०-३४-०१**

माणगांव,
दिनांक ७ मार्च २०२४.

डॉ. संदीपान सानप,
भूसंपादन अधिकारी,
(राज्य महामार्ग क्र. ९७)
तथा
उप विभागीय अधिकारी,
माणगाव उप विभाग, माणगाव.

उपविभागीय अधिकारी, माणगांव, उपविभाग, माणगांव यांजकडून

खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस.

क्रमांक उविअ/भूसं/कात-५/घरोशी/एस आर-१७३/२०२१/२०२३.—ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांचेकडील पत्र जा.क्र.मवि/मशा/का-३(१)१११६, दि.२५/०४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचेकडे ' इंदापूर - पाचाड - दापोली राज्य महामार्ग क्र. ९७' च्या रुंदीकरणाकरीता **मौजे घरोशी, ता. माणगांव येथील २-२८-६० हे. आर. चौ. मी.** क्षेत्र संपादन करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

त्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील आदेश क्र. भुसंपादन/टे-६ /इ.पा.म.क.वि.दा.रस्ता रा.मा.९७/२०२१, १६/०९/२०२१ अन्वये इंदापूर - दापोली - पाचाड राज्य महामार्ग क्र. ९७ च्या रुंदीकरणाकरीता प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या कामी महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक/संक्रिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे २०१५ व शासन परिपत्रक क्र. एलक्युएन -०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५/०१/२०१७ अन्वये **मौजे घरोशी, ता. माणगांव, जि. रायगड येथील जमिनींचे क्षेत्र २-२८-६० हे. आर. चौ. मी.** संपादन करण्याचा प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त झालेला असून त्या करीता उप विभागीय अधिकारी, माणगांव यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडील वरील प्राप्त प्रस्तावानुसार **मौजे घरोशी** या गावातील जमिनींचे राज्य महामार्ग क्र. ९७ चे रुंदीकरण या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासन निर्णय क्रमांक/संकिर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे २०१५ तसेच शासन परिपत्रक क्र. एलक्युएन -०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५/०१/२०१७ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने संपादित करण्यात येत आहे.

त्याअर्थी, आता

